




# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

POST REGD.No./DHL/53/24-26

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.३३९ ■ शुक्रवार ११ सप्टेंबर २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४







## आखातात युद्ध भडकले; अमेरिका-इराण आमनेसामने
## अमेरिकेचा तेल टँकर्सवर, इराणचा लष्करी तळावर हल्ला

**तेहरान, दि. १० : अमेरिका आणि इराणमधील तणाव पुन्हा एकदा टोकाला पोहोचला आहे. अमेरिकन सैन्याने इराणशी संबंधित पाच तेल टँकर्सवर हल्ला केल्याचा दावा केला. या कारवाईनंतर काही तासांतच इराणने जॉर्डन मधील अमेरिकन लष्करीतळाच्या दिशेने २० बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे डागल्याचे वृत्त आहे. त्यामुळे मध्यपुर्वेतील परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे. अमेरिकन नौदलाच्या युद्धनौकेला लक्ष्य करण्यात आल्याचा दावा करत अमेरिकेने इराणशी संबंधित तेल टँकर्सवर कारवाई केली. इराणने स्टेट ऑफ होर्मुझमध्ये १० जहाजांवर हल्ला केल्याचा दावा केला आहे. यामध्ये अमेरिकेच्या २ जहाजांसह ८ तेल टँकर्सचा समावेश असल्याचे सांगण्यात आले. ही जहाजे प्रतिबंधित क्षेत्रातून जात असल्याचा दावा करत इराणने कारवाईचे समर्थन केले.**



अमेरिकन जहाजांवर इराणची नजर असल्याचे सांगण्यात आले. अमेरिकेच्या कारवाईनंतर इराणने कुवेत आणि बहरीनच्या बंदरांजवळ असलेल्या अमेरिकन तेल टँकर्सवर लक्ष केंद्रित केल्याचे सांगितले जात आहे. जहाजे बंदरात असोत किंवा समुद्रात, त्यांना लक्ष्य केले जाऊ शकते, असा इशारा इराणकडून देण्यात आला आहे. तसेच स्टेट ऑफ होर्मुझमध्ये अमेरिकेचे पाण्याखालील ड्रोन ताब्यात घेतल्याचाही इराणने दावा केला आहे. खार्ग बेटाजवळही हल्ला

अमेरिकन सैन्याने ओमानच्या आखातात चार तेल टँकर्सना लक्ष्य केल्याचे सांगण्यात आले. आणखी एका टँकरवर इराणच्या खार्ग बेटाजवळ **(पान ४ वर)**

## जरांगेंविरुद्ध ईडीकडे तक्रार
### बारसकरांचा गंभीर आरोप

मुंबई, दि. १० : मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांच्या विरुद्ध मराठा आरक्षण अभ्यासक अजय बारसकर यांनी अंमलबजावणी संचालनालयाकडे तक्रार केल्याचा दावा केला आहे. जरांगे आणि त्यांच्या काही सहकाऱ्यांनी आंदोलनाच्या नावाखाली भ्रष्टाचार करून अवैध संपत्ती कमावल्याचा आरोप बारसकर यांनी केला आहे. ईडी कार्यालयाबाहेर माध्यमांशी बोलताना बारसकर यांनी सांगितले की, ईडीकडून त्यांना कार्यालयात बोलावण्यात आले होते. त्यानुसार त्यांनी डेप्युटी डायरेक्टर यांच्याकडे आपली बाजू मांडत असल्याचे सांगितलेले काही पुरावे सादर केले.

मनोज जरांगे यांच्यासह त्यांच्या काही सहकाऱ्यांच्या कथित आर्थिक **(पान ४ वर)**

### गुलाबराव पाटलांचा मित्र पक्षांना थेट इशारा
## शिवसैनिकांवरील अन्याय खपवून घेणार नाही
## मंत्री उदय सामंत संघटनात्मक मेळाव्यात टोला

नंदुरबार, दि.१० (प्रतिनिधी)- **शिवसैनिकांच्या जीवावर जिल्ह्यात शिवसेनेची ताकद आहे. एकीकडे शिवसेना वाढत असताना मात्र मित्र पक्षच जर शिवसैनिकांवर अन्याय करत असेल तर ते कदापी खपवून घेतलं जाणार नाही असा थेट इशारा उद्योग मंत्री उदय सामंत आणि पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी भाजप व राष्ट्रवादीला लगावलेला आहे. मनिंदकाचे घर असावी शेजारीफ या म्हणीप्रमाणे शिवसेनेवर टीका करत मग्न रहावी यातच आमच्या फायदा असल्याच्या टोला दोघामंत्र्यांनी शिवसेना संघटनात्मक मेळाव्यात लगावला.**

शहरातील श्री छत्रपती शिवाजी महाराज नाट्य मंदिरात गुरुवारी शिवसेना संघटनात्मक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी आ. चंद्रकांत रघुवंशी यांनी शिवसेना लोकप्रतिनिधींच्या मतदारसंघात विकास कामांसाठी निधी मिळत नसल्याची बाब उद्योग मंत्री उदय सामंत आणि पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांच्या निदर्शनास आणून दिली असता. दोघामंत्र्यांनी महायुतीतील मित्रपक्ष असलेल्या भाजप आणि राष्ट्रवादीला थेट इशारा दिला.

यावेळी मंत्री उदय सामंत म्हणाले,जिल्ह्यात शिवसैनिकांच्या जीवावर शिवसेनेची ताकद एक नंबर आहे. शिवसैनिकांनी काळजी करू नये या जिल्ह्याचे आमदार मी आणि मंत्री गुलाबराव पाटील दोन्ही आहोत. शिवसैनिकांच्या अडीअडचणी त्यांच्या व्यथा काय आहेत याची जाणीव असून, त्यांच्यावर अन्याय होणार नाही याची खबरदारी आम्ही घेऊ. जिल्ह्यात अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आमदार चंद्रकांत रघुवंशी हे शिवसेना वाढवत आहेत. पक्षासोबत फक्त शिवसैनिकच आहेत.शिवसेना जरी महायुतीत काम करीत आहे तरी मित्रपक्ष शिवसैनिकांवर का अन्याय करीत आहे असा प्रश्न आहे.

पाणीपुरवठा मंत्री गुलाब पाटील म्हणाले, **(पान ४ वर)**

## ऑगस्ट २०२७ पर्यंत पाण्याची उपलब्धता राहील, असे नियोजन करा- ना.हसन मुश्रीफ




नंदुरबार,१० (प्रतिनिधी)- **जिल्ह्यात आतापर्यंत अपेक्षेपेक्षा कमी पाऊस झाला असून, उपलब्ध पाणीसाठ्याचा काटकसरीने वापर करून ऑगस्ट २०२७ पर्यंत पिण्याच्या पाण्याची उपलब्धता राहील, या दृष्टीने नियोजन करावे, अशा सूचना राज्याचे वैद्यकीय शिक्षण तथा नंदुरबार जिल्ह्याचे पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी दिल्या.**

नंदुरबार जिल्हाधिकारी कार्यालयातील रंगावली सभागृहात आज सकाळी आयोजित आढावा बैठकीत पालकमंत्री श्री. मुश्रीफ बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी, पोलिस अधीक्षक अश्विनी सानप, अपर जिल्हाधिकारी धनंजय गोगटे, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत पवार, निवासी उपजिल्हाधिकारी आशा संघवी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शंकर किरवे, यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्यात आतापर्यंत सुमारे ४७ टक्के पाऊस **(पान ४ वर)**

## प्रविणकुमार लाडेंची अध्यक्षपदी निवड

धुळे, दि.१०- धुळे जिल्हा



मुख्याध्यापक संघांतर्गत श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थचे छत्रपती शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रविणकुमार लाडे यांची धुळे महानगर मुख्याध्यापक संघाच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे कि, नुकतीच धुळे येथे धुळे जिल्हा मुख्याध्यापक संघाची बैठक झाली. प्रविणकुमार लाडे हे गेल्या अनेक वर्षापासून शिक्षण क्षेत्रात विद्यादानातून विद्यार्थ्यांना घडविण्याचे कार्य करीत आहेत. महानगर **(पान ४ वर)**

## आईच्या डोळ्यासमोर बिबट्याने बालकाची केली शिकार, अर्थे परिसरात जनतेत दहशत

शिरपूर दि.१०(का.प्र.)- **संपूर्ण तालुक्याला हादरवून सोडणारी घटना नऊ सप्टेंबरला रात्री साडेसातला अर्थे गावाच्या शिवारात घडली. घराबाहेर खेळत असलेल्या अडीच वर्षीय बालकाला त्याच्या आईच्या डोळ्यासमोर उचलून नेत बिबट्याने शिकार केली. १० सप्टेंबरला बालकाच्या शरीराचे काही भाग आढळून आले. या घटनेमुळे अर्थे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये दहशत पसरली असून त्यांना सतर्कतेचा इशारा वनविभागाने दिला आहे.**

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, मध्यप्रदेशातील बडवानी जिल्ह्यातील पर्मिया सोंगळ अर्थे शिवारात रऊफ शेख सुलेमान यांच्या शेतात रखवालदार म्हणून कामाला असून तेथेच सहकुटूंब राहतात. योगेश पर्मिया सोंगळ (वय अडीच वर्ष) हा त्यांचा मुलगा होता. नऊ सप्टेंबरला रात्री साडेसातला योगेश घराबाहेर खेळत असतांना बिबट्याने त्याला उचलून नेले. हा प्रकार पाहत असलेल्या योगेशच्या आईने आरडाओरड केली. स्थानिक वनरक्षक ज्ञानेश्वर शिरसाठ यांनी वनविभागाला माहिती दिल्यावर सहायक वनसंरक्षक राहुल घरटे, उपवनसंरक्षक मोहन नाईकवाडी, विभागीय वनाधिकारी सदगीर, वन परिक्षेत्र अधिकारी किरण गिरवले, भूषण वाघ, सुनिल जोग, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. कुलदीप भामरे, प्राणिमित्र योगेश वारुडे, वनपाल बाबूलाल महाले आदि घटनास्थळी पोहचले.

वनविभागाच्या पथकाने रात्रभर शोध घेतल्यानंतर १० सप्टेंबरला सकाळी सातला घटनास्थळापासून अर्धा किलोमीटर अंतरावर दीड ते दोन वर्षाचा बिबट्या तुरीच्या शेतातून ऊसाच्या शेताकडे जातांना आढळला. पथकाने तुरीच्या शेतात शोध घेतल्यावर योगेशचा हात, डोक्याचा व पाठिचा काही भाग आढळला. उर्वरित शरीर बिबट्याने फस्त **(पान ४ वर)**

## जि.बँकेत कै.दादासाहेब रावल जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम

धुळे, दि.१०- धुळे व नंदुरबार



जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.धुळे चे संस्थापक अध्यक्ष कै. दादासाहेब रावल यांची १०२ वी जयंती बँकेचे मुख्य कार्यालय गरूड बाग येथे साजरी करण्यात आली.

यावेळी बँकेचे अध्यक्ष राजवर्धनजी कदमबांडे यांनी प्रतिमेस पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली. तसेच बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज चौधरी, सरव्यवस्थापक अनिल सिसोदे व इतर सर्व अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## गायकवाड चौकात सिलेंडरचा स्फोट घराचे मोठे नुकसान, महिला जखमी

धुळे, दि.१०- **जुन्या धुळ्यातील गायकवाड चौकात एका घरात गॅस सिलेंडरचा भीषण स्फोट झाला आहे. सुदैवाने यात मोठी जीवितहानी टळली असली, तरी घराची अक्षरशः पडझड झाली असून संसारोपयोगी साहित्याचं मोठं नुकसान झालं आहे.**



धुळे शहरातील जुने धुळे परिसरातील गायकवाड चौकात एक मोठी दुर्घटना थोडक्यात टळली, मात्र एका कुटुंबाचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. सायली अक्षय साळवे यांच्या घरात ही घटना घडली असून, मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार साळवे यांच्या सासूबाई स्वयंपाकघरात चहा करण्यासाठी गेल्या होत्या. गॅसवर चहा ठेवून त्या पुढच्या खोलीत आल्यानंतर अवघ्या काही वेळातच मागच्या बाजूला असलेल्या किचनमधील सिलेंडरचा मोठा स्फोट झाला. या स्फोटाची तीव्रता इतकी भीषण होती की, **(पान ४ वर)**



## तेली समाज वधु-वर मेळावा फॉर्मचे करनकाळांच्या उपस्थितीत प्रकाशन

धुळे, दि.१०- जिल्हा **तिळवण तेली समाज मंडळाच्या वतीने, राज्यस्तरीय वधु-वर व पालक परिचय मेळाव्याचे आयोजन, कै. दादासाहेब शिवदास भगा चौधरी नगर, पाडवी नुतन विद्यालय, स्टेशन रोड, धुळे येथे, दि. २२/११/२०२६ रोजी सर्वानुमते करण्यात आले आहे. या मेळाव्यासंदर्भातील, फॉर्म चे प्रकाशन, दि. ९/९/२०२६ रोजी, जिल्हाध्यक्ष तथा प्रथम महापौर भगवान रामभाऊ करनकाळ यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले.**

फॉर्म चे प्रकाशन,- गजानन रामदास चौधरी, संदिप शिवदास चौधरी, हेमचंद्र निळकंठ चौधरी, बाळकृष्ण निळकंठ चौधरी, कल्पेश गजानन चौधरी, भटुबापु संतोष चौधरी, महेंद्र संतोष चौधरी, सुनिल संतोष चौधरी, चंद्रकांत मधुकर **(पान ४ वर)**

### मनपा स्थायीत सुविधांची सोडून बॅनर्सचीच चर्चा
## बॅनर लावण्यापूर्तीच भक्ती असेल तर अशी भक्ती काय कामाची- नगरसेवक धिरज कलंत्री गरजले

धुळे, दि.१०- **महापालिकेने गणेशोत्सवानिमित्त जाहिरातीचे दर कमी करण्यासंदर्भातील विषय स्थायी समिती समोर मांडला. त्यावर नगरसेवक धिरज कलंत्री यांनी जाहिरातीचा दर चार रूपये चौरस फूट ऐवजी दोन रूपये चौरस फूट करण्याच्या विषयावर आपले परखड मत मांडले. याच काळात मनपाला चांगले उत्पन्न मिळू शकते, बॅनर बनवणारे आपला दर कमी करत नाही, महापालिकेने दर कमी का करावे? असा सवाल उपस्थित करत बॅनर लावण्यापूर्तीच काहींची भक्ती असेल तर अशी भक्ती काय कामाची ? असा संतप्त सवालही कलंत्री यांनी स्थायी समिती सभापतींसमोर उपस्थित केला. स्थायी सभेत आठ पैकी सात विषय मंजूर तर एक विषय तहकुब ठेवण्यात आला.**

भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात घेण्यात आलेली स्थायी समिती सभा सभापती लताबाई सोनार यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी अति.आयुक्त करूणा डहाळे, उपायुक्त मनोज वाघ यांच्यासह स्थायी समिती सदस्य उपस्थित उपस्थित होते. बॅनरबाजीच्या विषयावर सदस्यांनी आपापली मते व्यक्त केली. पुढे बोलतांना कलंत्री म्हणाले की, गणेशोत्सवासाठी जाहिरातीचे दर कमी करण्याची सुट दिल्यास भविष्यात इतर समाजांकडूनही तशा प्रकारची मागणी केली जावू शकते. त्यावेळी त्यांना परवानगी न दिल्यास परिस्थिती बिघडू शकेल. असेही सांगितले.

गणेशोत्सव काळात मंडळांना जाहिरातीचे दर कमी करण्याचा निर्णय योग्य आहे. दर आणखी कमी करण्यात यावे. सार्वजनिक उत्सव साजरे करणाऱ्या मंडळांवर आर्थिक **(पान ४ वर)**



### अनुसूचित जमात संघर्ष समिती
## नंदुरबार जिल्हा अध्यक्षपदी हेमंत सुर्यवंशी, उपाध्यक्षपदी हिम्मत कोळी

नंदुरबार, दि.१०- **आद्य क्रांतिकारी राघोजी भांगरे प्रणित आदिवासी टोकरे कोळी,कोळी ढोर,कोळी महादेव, डोंगर कोळी,मल्हार कोळी अनुसूचित जमातीची संघर्ष समितीच्या नंदुरबार जिल्हयाच्या अध्यक्षपदी हेमंत सूर्यवंशी, सरचिटणीस पदी भरत राजाराम कोळी, संघटकपदी कांतीलाल सोनीस, उपाध्यक्ष हिम्मत कोळी यांची निवड करण्यात आली आहे.**

कार्यकारिणीत सदस्यपदी दंगल कोळी, महिला खान्देश संघटक पदी इंदुताई सोनीस व धुळे जिल्ह्याच्या अध्यक्ष मनोहर वाघ, जिल्हा संघटक यशवंत ओंकार कोळी, सचिव किशोर शिरसाठ, उपाध्यक्ष लोटन कोळी,जिल्हा उपाध्यक्ष रवींद्र मोहने, जिल्हा कार्यकारिणी सदस्य पदी संदीप येळवे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संघर्ष समितीचे अध्यक्ष दत्ताभाऊ सुरवसे यांचे आदेशानुसार तसेच खान्देशचे नेते भिकाभाऊ सोनवणे,डॉ.राजेंद्र सावळे यांच्या मार्गदर्शनाखाली नियुक्ती करण्यात आली आहे.याबाबतचे नियुक्त पत्र पद्मालय रेस्ट हाऊस जळगाव येथे खान्देश मेळाव्यात संघर्ष समितीचे महाराष्ट्राचे अध्यक्ष दत्ताभाऊ सुरवसे यांच्या हस्ते देण्यात आली.आद्य क्रांतिकारी राघोजी भांगरे यांच्या संघर्षमय विचारांचा प्रचार आणि प्रसार करण्यासोबतच सामाजिक संघटनेच्या वाढीसाठी सर्व्यांना सोबत घेऊन कार्य करण्याची जबाबदारी नव नियुक्त पदाधिकारी यांच्यावर सोपावण्यात आली आहे.तसेच आदिवासी टोकरे कोळी, कोळी ढोर, कोळी महादेव, कोळी मल्हार, डोंगर कोळी या जमातीच्या न्याय हक्कासाठीच्या संघर्षात सक्रिय योगदान देण्याचे आवाहन नियुक्ती पत्रातून करण्यात आले आहे. नियुक्त पदाधिकारी **(पान २ वर)**


**दिपक ज्वेलर्स**

सोने- 22 K -1,41,700 रु.+3% GST

सोने- 24 K -1,54,000 रु.+3% GST

चांदी- 2,45,000 रु.+3% GST

तारगल्ली, सराफ बाजार, धुळे

फोन नं.२३३१०३/२३४१०३


## सुझलॉन टॉवरवर सशस्त्र दरोडा दोन कर्मचाऱ्यांना मारहाण; पंधरा अनोळखी इसमांवर गुन्हा दाखल

नंदुरबार, दि.१० (प्रतिनिधी)- **तोंडाला काळे कपडे बांधून आलेल्या १० ते १५ अनोळखी सशस्त्र व्यक्तींनी इंद्रिहट्टी शिवारातील सुझलॉन टॉवरवर दरोडा टाकत सुरक्षा पर्यवेक्षकांसह दोघांना बेदम मारहाण केली. या दरोड्यात २ लाख ५० हजार रुपये किमतीचे कॉपर केबल आणि ३ लहान रोहित्र चोरून नेण्यात आले. याप्रकरणी नंदुरबार तालुका पोलीस ठाण्यात १० ते १५ अनोळखींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

नंदुरबार तालुक्यातील इंद्रिहट्टी शिवारात सुझलॉन कंपनीचा टॉवर आहे. या ठिकाणी सुरक्षा पर्यवेक्षक सुरेश वामन ठाकरे आणि चिंधु रामदास धनगर हे बोलेरो वाहन क्रमांक एमएच ३९ जे ५६३५ ने आले होते. रात्री १२ वाजेच्या सुमारास १० ते १५ अनोळखी व्यक्ती तोंडाला काळे कपडे बांधून आणि अंगात काळे कपडे घालून तेथे आले. त्यांच्या हातात लाठ्या-काठ्या, लोखंडी पाइप, कोयते व इतर हत्यारे होती. त्यांनी अहिराणी व हिंदी भाषेत बोलत सुरेश ठाकरे आणि चिंधु धनगर यांना बेदम मारहाण केली.

त्यानंतर दोघांना जीवे ठार मारण्याची धमकी देत त्यांच्याकडील मोबाईल जबरीने काढून घेतले आणि दोघांना झोपडीच्या दांड्याला बांधून ठेवले. त्यानंतर टॉवरचा दरवाजा मशिनच्या सहाय्याने कापून आत प्रवेश केला. दरोडेखोरांनी १ लाख ७५ हजार रुपये किमतीची २५० मीटर कॉपर केबल तसेच ७५ हजार रुपये किमतीचे टॉवरमधील ३ लहान रोहित्र असा एकूण २ लाख ५० **(पान २ वर)**

### बेटावदला दुर्दैवी घटना
## पांझरेत बैल धुतांना बळीराजाचा बुडून मृत्यू

सोनगीर दि. १०(प्रतिनिधी)-



बैलपोळ्याच्या सणाच्याच दिवशीच बैलांना नदीवर धुण्यासाठी घेऊन गेलेल्या एका २८ वर्षीय तरुण शेतकऱ्याचा पाण्याचा अंदाज न आल्याने बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना गुरुवारी दुपारी साडेबारा वाजेच्या सुमारास शिंदखेडा तालुक्यातील बेटावद येथील पांझरा नदीपात्रात घडली. या घटनेमुळे संपूर्ण गावावर शोककळा पसरली असून पोळ्याच्या सणावर विरजण **(पान २ वर)**

## मा.नगराध्यक्ष स्व.रावसाहेब चव्हाण स्मरणार्थ विद्यार्थ्यांना आज वह्यांचे वाटप

शिरपूर, दि.१०- **शिरपूर शहराचे माजी नगराध्यक्ष, धुळे व नंदुरबार जिल्हा बँकेचे दिवंगत संचालक स्व.रावसाहेब प्रभाकरराव तुकाराम चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त आज ११ सप्टेंबर रोजी पांडू बापू माळी म्युनिसिपल हायस्कूल येथे विद्यार्थ्यांना वह्या वाटप व आदरांजली कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.**



स्व.रावसाहेब प्रभाकरराव चव्हाण यांच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी दि. ११ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता पांडू बापू माळी म्युनिसिपल हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयातील होतकरू व गरीब विद्यार्थ्यांना मोफत शालेय वह्यांचा संच वाटपाचा कार्यक्रम माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच आमदार काशिराम **(पान २ वर)**

## अमरिशभाई पटेलांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त खुली मॅरेथॉन स्पर्धा

शिरपूर, दि.१०- **श्री विलेपार्ले केळवाणी मंडळ संचालित आमदार अमरिशभाई आर. पटेल पोलीस अकॅडमी, शिरपूर आणि अस्तित्व सोशल वेल्फेअर फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त भव्य खुल्या मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.**



एस.व्ही.के.एम. संस्था सहअध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष चिंतनभाई पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली शिरपूर शहर व तालुक्यातील युवक-युवती तसेच धावपटूंमध्ये क्रीडा संस्कृतीला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

ही मॅरेथॉन दि.१२ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ६ वाजता होणार आहे. स्पर्धेचे आयोजन आर. सी. पटेल फार्मसी कॉलेज, करवंद नाका, शिरपूर येथे करण्यात आले आहे.

स्पर्धा खुल्या स्वरूपाची असून महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र गट ठेवण्यात आले आहेत.

विजेत्यांसाठी आकर्षक पारितोषिके देण्यात येणार आहेत. स्पर्धेतील महिला व पुरुष या दोन्ही गटांतील प्रथम तीन क्रमांकाच्या विजेत्यांना रोख पारितोषिकांसह ट्रॉफी व मेडल प्रदान करण्यात येणार आहेत. प्रथम क्रमांक ३१ हजार रुपये, ट्रॉफी व मेडल, द्वितीय क्रमांक २१ हजार रुपये, ट्रॉफी व मेडल, तृतीय क्रमांक ११ हजार रुपये, ट्रॉफी व मेडल. विशेष म्हणजे, स्पर्धेत सहभागी होणाऱ्या प्रथम १५०० स्पर्धकांना टी-शर्ट व मेडल देण्यात येणार आहे.

**क्रीडेकडे वळविण्याचा उपक्रम**

आजच्या काळात युवकांमध्ये शारीरिक **(पान २ वर)**

### धनादेश अनादर प्रकरण
## न्यायालयाने आरोपीला सुनावली एक महिन्याची सक्तमजुरी व दंड

धुळे, दि.१०- **कर्जाच्या थकबाकीपोटी दिलेला धनादेश (चेक) न वटल्याप्रकरणी धुळे येथील ८ वे अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयाने महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. आरोपी राजेश मैकुलाल चित्ते याला दोषी ठरवत एक महिना सक्तमजुरीची शिक्षा आणि १ लाख २५ हजार रुपये नुकसान भरपाई देण्याचा आदेश न्यायालयाने दिला आहे.**

आरोपी राजेश मैकुलाल चित्ते (रा. धुळे) याने शालीभद्रा फायनान्स कंपनी लि. या खाजगी फायनान्स कंपनीकडून ९३ हजार रुपयांचे वाहन कर्ज घेतले होते. कर्जाच्या थकबाकीच्या हप्त्यांच्या परतफेडासाठी त्याने फायनान्स कंपनीला १,१६,३९१ रुपयांचा धनादेश दिला होता. परंतु, सदर धनादेश बँकेत जमा केला असता तो न वटता परत आला. त्यामुळे शालीभद्रा फायनान्स कंपनीने धुळे न्यायालयात राजेश चित्ते याच्याविरोधात कलम १३८ अन्वये **(पान २ वर)**

## आ.अग्रवालांचा वाढदिवस; शिबीर

धुळे, दि.१०- शहराचे आ.अनुप



अग्रवाल यांच्या वाढदिवसानिमित्त एबी फाउंडेशनच्या माध्यमातून गोरगरीब व गरजू रुग्णांच्या सेवेसाठी सेवा संकल्प अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत आरोग्य तपासणी, उपचार व शस्त्रक्रिया शिबिरांचे आयोजन दि. ११ सप्टें, रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत गुजरात येथील तज्ज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत खुबा, गुडघा, लिगामेंट तपासणी तसेच प्रत्यारोपण शस्त्रक्रियेसंदर्भातील विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर ४० फूट रोड, साई स्पर्श हॉस्पिटल, शिव कुटिया समोर करण्यात आले आहे.

# आपला महाराष्ट्र

## विनोबांच्या जयंती निमित्त अभिवादन

आज आचार्य भारत रत्न विनोबांची जयंती आहे.१३० वर्षाहून अधिक काळ झालेला असताना त्यांच्या विचारांची प्रासंगिकता कायम आहे.कारण त्यांनी जे अहिंसक आंदोलनाचे शंख फुंकले त्यास जगात तोड नाही.जगात सर्व क्रांती तलवार किंवा बंदुकीच्या जोरावर झाल्या परंतु भारतात स्वातंत्र्य विनाशस्त्र मिळाले.तदनंतर अहिंसक आंदोलनाचा पुकारा विनोबांनी केला. भूदान व ग्रामदान आंदोलन त्यांचे नाव.१४ वर्षे देशभर पदयात्रा करीत त्यांनी देशांतून ४७ लाख पन्नास हजार एकर जमीन दानात मिळविली.अध्यात्म आणि प्रेम यांतून हा चमत्कार घडला.महाभारत आपणा सर्वांना माहीत आहे.सुईच्या टोकावर बसेल इतकीही जमीन मिळणार नाही या मुद्द्यावर महाभारत घडले.आजही जमिनीवरून न्यायालयात अगणित खटले पोहचतात.मारामाऱ्या होतात खून पडतात.भावाभावात भानगडी होतात.या सर्व पार्श्वभूमीवर विनोबांनी लाखो एकर जमीन मिळवली ही बाब आश्चर्यकारक म्हणावी लागेल.एवढेच विनोबांचे कार्य नाही तर त्यांनी पुढे जाऊन ग्रामदानाची संकल्पना मांडली. देशात जी गावे ग्रामदानी आहेत तेथील कारभार अतिशय आदर्श असून तिथे अन्य भानगडी नाहीत.ग्रामपंचायती ऐवजी ग्राममंडळे आहेत.त्यात निवडणूक होते पण ती बिनविरोध करण्याची पध्दत आहे.जमिनीची मालकी ग्राम मंडळाची असते.त्यामुळे या गावांच्या जमिनीवर माफियांच्या नजरा जाऊ शकत नाहीत.पण आता त्या खिळल्या असून गावकरींना शेती विकून पैसा भरपूर मिळेल अशी अमिषे दाखविण्यात येत आहेत.

काही आमदारांनी त्यांना हाताशी धरून ग्रामदान कायदा निरस्त करण्याचा घाट घातला जात आहे.विनोबा पवनारला राहत होते.तिथेच त्यांचे निर्वाण झाले.मुख्यमंत्री विदर्भाचे, आमदार त्याच भागातील आहेत. त्यांचा पक्ष विनोबांचे नाव आणि तत्वज्ञान पुसून टाकू पाहत आहेत.सर्वोदय जगतातून कायदा निरस्त करण्यास विरोध होत आहे.एकिकडे सरकार विनोबांना भारत रत्न प्रदान करते तर दुसरीकडे ग्रामदान संपवू इच्छिते.असा उफराटा महाराष्ट्रातील प्रवास सुरू आहे.महाराष्ट्रात एकूण गावे ६५ हजार ६६५ आहेत.पैकी फक्त वीस गावे ग्रामदानी आहेत.तेवढी देखील सरकारला चालत नाहीत.ग्रामदानाची संकल्पना चांगली असली तरी कालबाह्य झाल्याचे सरकारच्या प्रतिनिधींनी नोंदविले असून सरकार त्यावर् शिक्कामोर्तब करू इच्छिते ही बाब निषेधार्ह म्हणावी लागेल.याचा अर्थ सरकारला गांधी विनोबा चालत नाहीत.जेपी चालतात पण आणिबाणीच्या विरोधापुरतेच चालतात. सरकारची अशाप्रकारे दुटप्पी भूमिका आहे. विनोबांची आणखी एक महत्वाची कामगिरी म्हणजे गीतेचे समश्लोकी भाषांतर होय. ज्यांना संस्कृत समजत नव्हते त्या त्यांच्या मातोश्रींनी गीता मराठीत करावी असे सांगितले होते त्यानुसार विनोबांनी गीताईचे प्रयोजन केले.अतिशय सुलभ गीताई कुणालाही कळेल अशीच आहे.तिचे प्रकाशन धुळे तुरुंगात झाले होते.देशभक्त जमनालाल बजाज यांनी त्यासाठी १९३२ साली पाच हजार रूपये खर्च करून धुळ्यातील समर्थ छापखान्यात ती छापून घेतली होती.प्रकाशना नंतर एका कैद्यास फासावर जाण्याचा दिवस जवळ आला होता.तेव्हा त्याने जेलरला दोन आणे मागितले.जेलरने दिले.एक आण्यांची गीताई त्याने घेतली आणि दुसरा आणा विनोबांना दक्षिणा म्हणून दिला.या नंतर राजकीय बंदी जनांनी गीतेवर व्याख्याने देण्याची विनंती विनोबांना केली ती मान्य करून विनोबांनी फेब्रुवारी १९३२ चा रविवार ते जून १९३२ चा शेवटचा रविवार अशी अठरा प्रवचने जेलमध्ये झाली.ती शब्दशः साने गुरुजींनी लिहून घेतली.त्याचा गीता प्रवचने या नावाचा ग्रंथ तयार झाला.

सहा भाषांत आवृत्या निघाल्या.जर्मन भाषेतही गीताप्रवचन प्रकाशित झाले.पंचावन लाखांहून अधिक प्रती आतापर्यंत खपल्या. गुरूजींच्या सिध्द हस्त लेखणी मुळेच हा ग्रंथ साकार झाला असे विनोबांनी प्रस्तावनेतच म्हटले आहे.हा सर्व ऐवज धुळ्याच्या तुरुंगात तयार झाला.त्यामुळे धुळे शहराचे नाव जगभर पोहचले.धुळे येथील गांधी तत्वज्ञान केंद्रात विनोबा येत असत कारण त्यांचें लहान बंधू शिवाजी भावे तीस वर्षे येथेच होते.त्यांचे वडील नरहर भावे यांचे देहावसान गांधी तत्व केंद्रातच झाले.त्यांची समाधी तेथे आहे. विनोबांनी गीता प्रवचनाच्या प्रस्तावनेत एक विशेष बाब नोंदविली आहे.एका बाजुला अठरा औक्षिणी सैन्य उभे आहे .तर दुसऱ्या बाजूला एकोणीस औक्षिणी सैन्य उभे आहे. दोन्ही युद्धासाठी तयार आहेत पण अर्जून तयार नाही.कारण त्यास समोर आपलेच लोक दिसतात.त्यांना ठार कसे करावे असा यक्ष प्रश्न त्यांच्या समोर आहे.तेव्हा कृष्णाने त्यास गीतेत असलेले तत्वज्ञान सांगितले. अर्जून मोहात अडकल्याने तो युद्धास तयार नव्हता.त्यातून मुक्त करण्यासाठी गीतेचे प्रयोजन आहे.त्यासाठी विनोबांनी एक उदाहरण न्यायालयातील जज्जचे दिले आहे. अनेकांना शिक्षा ठोठावण्यात येत असताना एक दिवस त्याचाच मुलगा आरोपी म्हणून समोर आला.तेव्हा तो जीवनाचे तत्वज्ञान सांगू लागला.वंश विच्छेद वाईट असल्याचे सांगू लागला कारण तो मुलाच्या मोहात अडकला होता.तीच गत अर्जुनाची झाली होती.गीता प्रवचनातील हे तत्वज्ञान सर्वांना लागू आहे.आपण असेच अखेर पर्यंत मोहात अडकलेलो असतो.गरजांपेक्षा अधिक मिळावे या साठी धडपडत असतो.त्यातच संपूनही जातो जगण्याचा आनंद उपभोगत नाही.विनोबांनी कांचन मुक्तीची योजनाही सांगितली होती.सरकार अशा तत्वज्ञानी ऋषींच्या जीवावर उठले आहे.गाव म्हणजे केवळ घरांचा समूह नव्हे, तर एक कुटुंब असावे, गावाच्या साधनसंपत्तीवर गावाचा सामूहिक अधिकार असावा, निर्णय सामूहिक पद्धतीने घेतले जावेत आणि संघर्षाऐवजी सहकार्याची व्यवस्था उभी राहावी, हा ग्रामदानामागचा विचार होता.ग्रामदानी गावांमध्ये ग्रामपंचायतीऐवजी ग्राममंडळाची संकल्पना आहे. निवडणूक असली तरी ती शक्यतो बिनविरोध करण्याची पद्धत आहे. जमिनीची मालकी ग्राममंडळाकडे असल्यामुळे वैयक्तिक विक्रीपेक्षा सामूहिक हिताला महत्त्व मिळते. अशा व्यवस्थेमुळे बाहेरील जमीनमाफिया किंवा सट्टेबाजांच्या नजरेपासून गावाच्या जमिनीचे संरक्षण होऊ शकते.महाराष्ट्रात आज सुमारे ६५ हजार ६६५ गावे आहेत. त्यापैकी केवळ वीस गावे ग्रामदानी आहेत म्हणजे संपूर्ण महाराष्ट्रात ग्रामदानाचा हा प्रयोग किती अल्प प्रमाणात आहे, याची कल्पना येते.पण आश्चर्याची गोष्ट अशी की एवढी मोजकी ग्रामदानी गावेही आज संकटात आहेत.

या गावांतील जमिनी विकून भरपूर पैसा मिळेल, अशी प्रलोभने दाखविली जात आहेत. काही राजकीय शक्तींच्या माध्यमातून ग्रामदान कायदा रद्द करण्याचे प्रयत्न होत असल्याचा आरोप सर्वोदय परिवाराकडून केला जात आहे. ग्रामदानाची संकल्पना कालबाह्य झाली आहे, अशी भूमिका सरकारी प्रतिनिधींकडून मांडली जात असेल, तर त्याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. कारण प्रश्न केवळ वीस गावांचा नाही.प्रश्न असा आहे की सामूहिक मालकी, सहकार्य, बिनविरोध लोकशाही आणि ग्रामस्वराज्य या मूल्यांना आपण आजही मानतो का?विनोबा पवनारला राहिले. विदर्भाच्या भूमीत त्यांचे कार्य फुलले आणि त्याच भूमीत त्यांचे निर्वाण झाले. अशा व्यक्तीला भारतरत्न देणे ही निश्चितच अभिमानाची बाब आहे. पण एकीकडे भारतरत्न देऊन विनोबांचा गौरव करायचा आणि दुसरीकडे त्यांच्या ग्रामदानाच्या प्रयोगाला संपुष्टात आणण्याचा प्रयत्नी करायचा, असे असेल तर ही विसंगती प्रश्न निर्माण करणारी आहे.विनोबांना केवळ पुतळ्यात, जयंतीत किंवा पुरस्कारात बंदिस्त करून चालणार नाही. त्यांच्या विचारांची कसोटी आजच्या निर्णयांवर लागली पाहिजे.गांधी, विनोबा, जयप्रकाश यांचे नाव घेणे सोपे आहे; त्यांच्या विचारांनुसार समाजव्यवस्था उभी करणे कठीण आहे.

## न्यायालयाने आरोपीला सुनावली

(पान १ वरून) खटला दाखल केला. सदर खटल्यातील पुरावे आणि साक्षीदारांची तपासणी केल्यानंतर, ८ वे अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी एम. बी. असीजा साहेब यांनी आरोपी राजेश चित्ते याला चलनक्षम दस्तऐवज कायदा कलम १३८ अन्वये दोषी ठरवले. न्यायालयाने आरोपीस एक महिना सक्तमजुरीची शिक्षा सुनावली आहे. तसेच धनादेशाच्या रकमेसह १,२५,००० रुपये (एक लाख पंचवीस हजार रुपये) नुकसान भरपाई म्हणून फिर्यादी फायनान्स कंपनीला देण्याचा आदेश दिला आहे. या खटल्यात शालीभद्रा फायनान्स कंपनीतर्फे अ‍ॅड. अशफाक शेख यांनी कामकाज पाहिले. त्यांना अ‍ॅड. फारूक बी. शेख, अ‍ॅड.आय.एस. काजी, अ‍ॅड. योगीता कांबळे आणि अ‍ॅड. सुलताना अन्सारी यांनी सहकार्य केले.









## पावसाच्या खंड कालावधीत पिके वाचविण्यासाठी शेतकऱ्यांनो उपाययोजना करा- शंकर किरवे

**नंदुरबार, १० (प्रतिनिधी)- हवामान विभागाच्या अंदाजानुसार यंदाच्या नैऋत्य मान्सून हंगामात (जून ते सप्टेंबर) पर्जन्यमान सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. एल-निनोच्या प्रभावामुळे खरीप हंगामात पावसाचे आगमन व वितरणात अनियमितता झाली असून, काही भागांमध्ये पावसाने ओढ दिल्याने खरीप पिकांवर ताण निर्माण झाला आहे. काही तालुक्यांमध्ये तीन आठवड्यांपेक्षा जास्त कालावधीकरिता पावसात खंड पडल्याचे दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर कृषी आयुक्तालय, पुणे यांच्या सूचनेनुसार नंदुरबार जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी पिके वाचविण्यासाठी खालील उपाययोजना कराव्यात, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, शंकर किरवे यांनी केले आहे.**

पिकांमध्ये आच्छादन (मल्चिंग) करावे तसेच कोळपणी करून पिकास मातीची भर द्यावी. बाष्पीभवन कमी करण्यासाठी पिकांच्या खालील भागातील पाने कमी करावीत आणि वाऱ्यावर आधारित आंतरपीकांचा वापर करावा. संरक्षित पाणी उपलब्ध असल्यास सकाळी किंवा संध्याकाळी पिकास पाणी द्यावे. ठिबक अथवा तुषार सिंचनास प्राधान्य द्यावे. यामुळे सुमारे ३० ते ५० टक्के पाण्याची बचत होऊ शकते. तसेच शेततळे व साठवण बंधाऱ्यातील संरक्षित पाणी सिंचनासाठी वापरावे. पावसाचे पाणी जास्तीत जास्त जमिनीत मुरविण्यावर भर द्यावा. पिकांवरील ताण नियंत्रण व आंतरमशागत करावी. पावसाचा ताण पडल्यास टक्का युरिया/डीएपी अथवा १९:१९:१९ किंवा पोटॅशियम नायट्रेटची फवारणी करावी. लहान रोपाना सावली करावी. प्लास्टिक मल्चिंग व ठिबक सिंचनाचा वापर करावा तसेच नत्रयुक्त खतांचा वापर कमी करावा. फळझाडांच्या बुंध्याभोवती गवत, पालापाचोळा टाकून आच्छादन करावे.पाण्याचा ताण कमी करण्यासाठी केओलिन ८ टक्का किंवा पोटॅशियम नायट्रेट १ ते २ टक्के द्रावण फवारावे. तसेच १ टक्के बोर्डो मिश्रणाची फवारणी व खोडांना १० टक्के बोर्डोपेस्ट लावावी. कीड व रोग नियंत्रणासाठी योग्य फवारणी करावी. पक्षीघरे, चिकट सापळे व मित्र कीटकांचे संवर्धन करावे. हुमणी, शेंडी गोगलगाय व बोंडअळीच्या एकात्मिक व्यवस्थापनासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात. हवामान खात्यामार्फत पुढील पाच दिवसांचा पावसाचा अंदाज दिला जातो. शेतकऱ्यांनी या अंदाजाची माहिती घेऊन शेतीच्या कामांचे नियोजन करावे. अधिक माहितीसाठी आपल्या गावातील सहाय्यक कृषी अधिकारी, कृषी पर्यवेक्षक, मंडळ कृषी अधिकारी किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे.



## पटेल फार्मसी महा.त नाविन्य २०२६ ग्लोबल कॉस्मेटिक हेरिटेज प्रदर्शन

**शिरपूर, दि.१०- शिक्षक दिनाचे औचित्य साधून आर. सी. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च, शिरपूर येथील कॉस्मेटिक टेक्नॉलॉजी विभागातर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही अभिनव उत्पादन प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. सन पासून आयोजित करण्यात येणाऱ्या या प्रदर्शनाची यंदाची संकल्पना नाविन्य २०२६ ग्लोबल कॉस्मेटिक हेरिटेज अशी होती.**

कार्यक्रमाचे उद्घाटन संस्था सचिव रेषा पटेल यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. एस. जे. सुराणा, प्राचार्य डॉ. एन. जी. हासवाणी, उपप्राचार्य डॉ. ए. ए. शिरखेडकर, विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

उद्घाटनानंतर मान्यवरांनी प्रदर्शनातील विविध स्टॉल्सना भेट देऊन विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या उत्पादनांची व मॉडेल्सची पाहणी केली. विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलता, नावीन्यपूर्ण कल्पना, कलात्मकता आणि मेहनतीचे मान्यवरांनी कौतुक करून त्यांना प्रोत्साहन दिले. या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी भारत, जपान, फ्रान्स, इजिप्त, मोरोक्को, चीन, कोरिया, थायलंड आणि इंडोनेशिया आदी देशांच्या पारंपरिक सौंदर्यप्रसाधनांचा वारसा, सौंदर्यविषयक परंपरा आणि नैसर्गिक घटकांवर आधारित कॉस्मेटिक उत्पादनांचे आकर्षक सादरीकरण केले. पारंपरिक सौंदर्य पद्धती आणि आधुनिक कॉस्मेटिक विज्ञान यांचा सुरेख संगम प्रदर्शनातून अनुभवायला मिळाला. परीक्षकांनी विद्यार्थ्यांच्या विविध सादरीकरणांचे मूल्यमापन करून त्यांना मौल्यवान मार्गदर्शन केले. प्रदर्शनाच्या समारोपप्रसंगी विविध विभागांत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कॉस्मेटिक्स विभागप्रमुख डॉ. मनोजसिंह गिरासे, सहायक प्राध्यापिका रुचिरा गजभिये, प्रतीक्षा मेश्राम, सोनाली शंभरकर, प्रतीक्षा मारवाडकर, अक्षिता बारी, अनिता मंडल, गझल जैन यांनी मार्गदर्शन व सहकार्य केले.

शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सचिव सौ. रेषा पटेल, प्राचार्य डॉ. एस. जे. सुराणा, प्राचार्य डॉ. एन. जी. हसवाणी, उपप्राचार्य डॉ. ए. ए. शिरखेडकर यांनी शुभेच्छा दिल्या.

### प्रकाश में आज पुष्पा




आलु अर्जुन रश्मिका मंदाना फहद फासिल सुनिल सामंधा

## स्त्री शिक्षण संस्थेत शिक्षक दिन संपन्न

धुळे, दि.१०- धुळे येथील स्त्री शिक्षण संस्थेच्या कमलाबाई शं. कन्या शाळेत नुकताच शिक्षक दिन उत्साहात संपन्न झाला. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या यांचे प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलनाने तसेच स्वागत गीताने कार्यक्रमास सुरुवात झाली. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या माजी पर्यवेक्षिका हेमलता बागुल या होत्या. तर अध्यक्षस्थान माजी पर्यवेक्षिका जयश्री शिरोळे यांनी भूषविले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका रचना मोरे हिने तर मान्यवरांचा परिचय अनुक्रमे कुमारी नेहा चौधरी व पायल पाडवी यांनी करून दिला. याप्रसंगी उपमुख्याध्यापिका पूर्वा चौधरी हिने डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. यादी वाचन दामिनी माळी हिने केले. सत्काराला उत्तर शिक्षक प्रतिनिधी सौ. नीता सैंदाणे यांनी दिले. याप्रसंगी व्यासपीठावर स्त्री शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सीए के.यु. नाबरिया, सचिव शिल्पा म्हस्कर, सहसचिव साधना मानेकर, खजिनदार अरुणा नाईक, सदस्या जयश्री शहा, मुख्याध्यापिका छाया नाईक, पर्यवेक्षिका अरुणा सोनवणे, मनीषा पवार, अरुंधती ब्रम्हे, दत्तराज थोरे, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका अरुणा पानपाटील, बालमंदिरच्या मुख्याध्यापिका सोनाली जोशी आदी उपस्थित होते. याप्रसंगी शिक्षिकेच्या भूमिकेचे अनुभव दक्षता निकम वप्रगती वानखेडे यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केले. कार्यक्रमाची सूत्रे कनिष्का पाटील व प्रीती मुलमुले यांनी सांभाळली. कोणतेही कार्य करताना केवळ शिक्षणच नव्हे तर सकारात्मक दृष्टिकोन ठेवून आपल्यातील कलागुणांची जोपासना करा, जिद्द व चिकाटीच्या बळावर संकटांवर मात करून यशाचे शिखर गाठता येते अशा शब्दात प्रमुख पाहुण्या सौ. हेमलता बागुल यांनी आपले मत व्यक्त केले.

पान १ वरुन

## मा.नगराध्यक्ष स्व.रावसाहेब चव्हाण

दादा पावरा, लोकनियुक्त नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल, शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, उपनगराध्यक्षा सौ. संगिता देवरे, जि. प. माजी अध्यक्ष डॉ. तुषार रंधे, माजी उपाध्यक्ष देवेंद्र पाटील, उद्योगपती जनकभाई पटेल, भाजपा नंदुरबार प्रभारी बबनराव चौधरी, मुख्याधिकारी प्रशांत सरोदे, पाणी पुरवठा सभापती गणेश सावळे, आरोग्य सभापती डॉ. सौ वृषाली बडगुजर, महिला व बालकल्याण सभापती सौ. अरुणा थोरात, माधवराव पाटील, प्रशासकीय अधिकारी संजय हासवाणी, हस्ती बँक चेअरमन कैलासचंद्र अग्रवाल, मार्केट कमिटी सभापती के. डी. पाटील, अशोक कलाल, माळी समाज अध्यक्ष बाबुलाल माळी, जिल्हा बँक माजी संचालिका श्रीमती प्रमिला प्रभाकरराव चव्हाण, सर्व नगरसेवक व प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आला आहे.

आदरांजली वाहण्यासाठी सदर कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन न. प. शिक्षण सभापती शामकांत ईशी, बांधकाम सभापती वासुदेव देवरे, नगरसेवक इरफान मिर्झा, आशिष पाटील, राज सिसोदिया, नरेंद्र पाटील, देवेंद्र राजपूत, विनायक कोळी, जगदीश सोनगडे, सुरेश अहिरे, स्व. रावसाहेब प्रभाकरराव चव्हाण मित्र परिवार शिरपूर यांनी केले आहे.

## पांझरेत बैल धुतांना बळीराजाचा बुडून मृत्यू

पडले आहे.मंगेश ईश्वर माळी (वय २८, रा. कुंभार टेक परिसर, ) असे मृत तरुण शेतकऱ्याचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी बैलपोळ्यानिमित्त मंगेश माळी हा आपल्या घरातील बैलांना धुण्यासाठी गावाजवळून वाहणाऱ्या पांझरा नदीच्या पात्रातील पाणीपुरवठा विहिरीशेजारी गेला होता. दुपारी १२:३० ते १ च्या सुमारास नदीपात्रातील खोलगट भागाचा व पाण्याच्या अंदाज न आल्याने तो अचानक खोल पाण्यात बुडाला.

नदीपात्रात इतरही तरुण बैलांना धुवत होते. मंगेश बऱ्याच वेळापासून पाण्यातून बाहेर का येत नाही, ही शंका आल्याने शेजारील तरुणांनी तातडीने नदीत उड्या घेऊन त्याचा शोध घेतला व त्याला पाण्याबाहेर काढले.तरुणांनी मंगेशला तातडीने नरडाणा येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासून त्याला उपचारापूर्वीच मृत घोषित केले. या घटनेची नोंद नरडाणा पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यू म्हणून करण्यात आली आहे. गुरुवारी संध्याकाळी शवविच्छेदन करण्यात आले असून शुक्रवारी सकाळी ९ वाजता बेटावद येथे मंगेशवर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. मृत मंगेशच्या पश्चात आई, वडील आणि मोठा भाऊ असा परिवार आहे. ऐन सणाच्या दिवशी तरुण शेतकऱ्याचा अशा प्रकारे दुर्दैवी मृत्यू झाल्याने बेटावद परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## सुझलॉन टॉवरवर सशस्त्र दरोडा दोन कर्मचाऱ्यांना

हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जबरीने चोरून नेला. या मारहाणीत सुरेश वामन ठाकरे आणि चिंधु रामदास धनगर, रा. तलवाडे खुर्द, ता. नंदुरबार हे दोघे जखमी झाले. याबाबत सुरेश वामन ठाकरे यांनी नंदुरबार तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार १० ते १५ अनोळखी व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अमोल गुंजाळ करीत आहेत.

## नंदुरबार जिल्हा अध्यक्षपदी हेमंत सुर्यवंशी

यांचे अभिनंदन व पुढील वाटचालीस किरण कोळी,डॉ.राजेंद्र सावळे,भिका सोनवणे,शाम कोळी, किरण कोळी,भास्कर कुवर,संजय शिंदे,यशवंत ओंकार आखडमल, मंगलाताई सोनवणे,बापूराव कोळी,अशोक कोळी सर,मदन शिरसाठ,इंदुताई सोनीस,राहुल कोळी व समाज बांधवाकडून अभिनंदनाचा वर्षाव होत असून सामाजिक संघटनेचे कार्य अधिक बळकट होईल असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## अमरिशभाई पटेलांच्या अमृतमहोत्सवी

तंदुरुस्ती, नियमित व्यायाम आणि आरोग्याविषयी जागरूकता निर्माण होणे गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवर मॅरेथॉनसारख्या उपक्रमातून युवकांसह सर्वांना धावणे, व्यायाम आणि क्रीडा क्षेत्राकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. पोलीस अकॅडमीच्या माध्यमातून शिस्त, शारीरिक क्षमता आणि फिटनेसला विशेष महत्त्व दिले जाते. त्यामुळे या स्पर्धेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. शिरपूर तसेच परिसरातील विविध गावांमधील धावपटू, युवक-युवती आणि क्रीडाप्रेमींनी या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन पोलीस अकॅडमी प्रमुख सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक अंसाराम आगरकर व आयोजकांनी केले आहे.

मॅरेथॉन स्पर्धेत नोंदणीसाठी अधिक माहितीसाठी आयोजकांनी सुभाष पावरा (९८९०२९२२३०), निखिल सालुंखे (९११२९१६७७६), मोनिका पावरा (८८८८६३४८५४), हितेश सोनार (९८३४३३०६०२) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## शब्दकोडे क्रमांक : २४५०



**आडवे शब्द :** १.सर्व नागरिकांसाठी खुले असलेले ४.शृंगार ६.देश ८.इंग्रजीत-नशीब ९.पहाटे खिडकीतून घरात येणारे सूर्यकिरण ११.गाणे १३.एक मोठ्या आकाराचे फळ १५.आक्षेप १८.स्वीकृती १९.चांगले २०.धीम्या गतीने चालणारा एक जीव २१.आदराने वाकलेला २२.कशासाठी २३.रद्द २५.सबब २७.वांग्यापासून बनवला जाणारा एक खाद्य पदार्थ २९.संगीतातील एक राग ३१.चार युगातील एक युग ३२.एक चंद्राच्या आकाराची टिकली ३३.मेघ ३७.बारा वर्षांचा काळ ३९.एक नैसर्गिक जलाशयाचा प्रकार ४१.दानी ४३.लज्जा ४४.दुर्लक्ष ४७.परीक्षा ४९.हिंदीत-मी ५०.नगराचा अध्यक्ष ५२.भारतीय स्त्रिया परिधान करतात तो पारंपारीक वस्त्र ५३.दिवा ५४.वायू **उभे शब्द :** १.हिंदीत-सोज्वळ,साधेपणा २.पाणी ३.समीप ४.शिकार ५.उचलण्यास भारी ७.घटस्फोट ९.एक पक्षी १०.धैर्य १२.ताजातवाना १४.आवड १६.तुकडा १७.पोहण्याचा कुत्रिम तलाव २०.कैची २१.आकाश २४.बिल्डिंग २६.रुची २८.आले ३०.खुंट-विरुद्ध ३४.गेलेला ३५.हृदय पिळवटून टाकणारे ३६.भगवान शंकराचे अस्त्र ३८.पळ ४०.कौतुक ४२.जखमी ४५.वधू-वराची मिरवणूक ४६.दैत्य ४८.एकी भित्रा प्राणी ५१.रानरेडा

### शब्दकोडे क्रमांक : २४४९ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बा | जा | र | | त | रू | णा | ई | | न | व | ल |
| ळ | | ता | प | | स | | मा | त | | ज | गी |
| | नि | ळे | | सा | | मौ | न | | मा | | दा |
| दै | ना | | कु | ज | बु | ज | | वा | य | दा | |
| व | द | न | | न | र | | र | च | ना | | बी |
| त | | फ | ळ | | खा | स | | न | | वा | |
| | फा | र | | टा | | दा | द | | छा | पी | ल |
| सा | | त | प | की | री | | रो | म | न | | गी |
| ध | न | | ट | | या | द | गा | र | | स | न |
| न | | प | री | ट | | स | | ग | री | ब | |
| | सा | प | | प | र | | का | ळ | | क | टी |
| सौ | | ई | म | ली | | ना | च | | नो | | प |

## पान १ वरुन

### आखातात युद्ध भडकले; अमेरिका-इराण आमनेसामने

हल्ला झाल्याचा दावा आहे. खार्ग बेट हे इराणच्या प्रमुख तेल निर्यात केंद्रांपैकी एक आहे. अमेरिकेने लक्ष्य केलेले पाच तेल टँकर्स अब्जावधी डॉलरच्या कथित गुप्त नेटवर्कचा भाग असल्याचे सांगितले जाते. हे नेटवर्क इराणच्या इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्डस् तसेच त्याच्या प्रादेशिक मित्रपक्षांसाठी निधी उपलब्ध करून देत असल्याचा अमेरिकेचा दावा आहे.

मीममधून ट्रम्प यांना टोला

दरम्यान, अमेरिका-इराणमधील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर ट्युनिशियातील इराणच्या दूतावासाने अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर निशाणा साधला. दूतावासाने बॉलिवूड अभिनेता अक्षय कुमारचा मीम शेअर करत ट्रम्प यांना अप्रत्यक्ष टोला लगावला. इराणने अमेरिकेचे पाण्याखालील ड्रोन ताब्यात घेतल्याचा दावा केल्यानंतर हा मीम शेअर करण्यात आला. त्यासोबत, पाण्याखाली ड्रोन हरवले, तेलाच्या किमती १०० डॉलरच्या जवळ पोहोचल्या आणि निवडणुका जवळ आल्या आहेत, असा मजकूर शेअर करत ट्रम्प यांच्या धोरणांवर प्रश्न उपस्थित करण्यात आला.

### जरांगेंविरुद्ध ईडीकडे तक्रार बारसकरांचा गंभीर आरोप

व्यवहारांची चौकशी करण्याची मागणी बारसकर यांनी केली आहे. यामध्ये पांडुरंग तारक, ईश्वर बलांडे, गंगाधर काळकुटे, श्रीराम पुरणकर, संजय कटारे, स्वप्नील तारक, बद्रीनाथ तारक, विलास खेडकर यांच्यासह अन्य व्यक्तींची नावे असल्याचे त्यांनी सांगितले. जरांगे यांच्या सहकाऱ्यांचा वाळू व्यवसायाशी संबंध असल्याचा आरोप बारसकर यांनी केला. या कथित व्यवहारांमध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा दावा करत संबंधितांच्या संपत्तीची आणि आर्थिक व्यवहारांची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी ईडीकडे केल्याचे सांगितले. यावेळी बारसकर यांनी काही व्यक्तींच्या जमीन खरेदी तसेच वाहन आणि उपचारांवरील खर्चाबाबतही प्रश्न उपस्थित केले. संबंधितांकडे एवढी संपत्ती आणि आर्थिक स्रोत कसे उपलब्ध झाले, याची चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली आहे. बारसकर यांनी कथित गैरव्यवहाराची रक्कम अत्यंत मोठी असल्याचा दावा केला असून त्याची सखोल चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. त्यामुळे ईडीच्या तपासानंतरच या आरोपांमध्ये तथ्य किती आहे, हे स्पष्ट होणार आहे.

### शिवसैनिकांवरील अन्याय खपवून घेणार नाही

शिवसेना हे तीन-चार वर्षांचं बाळ आहे असे विरोधकांकडून हिणवलं जात.८७ लोकप्रतिनिधी असलेला आमच्या पक्ष आहे.१५ खासदार आणि ७६ आमदार शिवसेनेत आहेत. विरोधकांनी आम्हाला कमी समजू नये. ज्या-ज्या वेळेस मागील कालावधीत शिवसेनेला दाबण्याच्या प्रयतक झाला असेल तितकाच शिवसैनिक जोमाने ताकदीनिशी लढायला तयार झाला आहे.

**मंत्र्यांच्या सवाल; नंदुरबार काय पाकिस्तानात आहे का ?**

शिवसेना मेळाव्यात पुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी जिल्ह्यात निधी वितरणाच्या बाबतीत पालकमंत्र्यांवर प्रश्न उपस्थित केला. या अगोदरच निधी वितरणाचे ठरले आहे. मी देखील जळगावचा पालकमंत्री असताना त्या ठिकाणी सर्व लोकप्रतिनिधींना निधी देत असतो. नंदुरबार काय पाकिस्तानात आहे काय असा खडा सवाल उपस्थित करून पालकमंत्र्यांना विधान परिषद आमदार निधी द्यावाच लागेल. नियम सर्वांना सारखाच आहे. जे कायदे करणार तेच कायदे तोडणार काय ? पालकमंत्री हसन मुश्रीफ हे समन्वय समितीत आहेत.

आ.चंद्रकांत रघुवंशी यांनी निधी वितरणाच्या बाबतीत अन्याय होत असल्याची भावना व्यक्त करतांना सांगितले, जिल्ह्यात शिवसेनेचे दोन आमदार असून शिवसैनिकांना न्याय देऊ शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. शासनाचा निकषानुसार विधानसभेच्या आमदाराला २० टक्के निधी, पालकमंत्र्यांना ३० टक्के निधी वितरित करण्यात येतो. आमदारांच्या शिफारशीने पक्षाच्या लोकप्रतिनिधींना निधी द्यावा. जेणेकरून जिल्हा नियोजन समितीच्या निधी मिळेल. जिल्ह्यात शिवसेनेची मोठी ताकद आहे. परंतु,सेना लोकप्रतिनिधींच्या मतदारसंघात विकास कामे व्हायला पाहिजे. त्यामुळे निधी वितरणाच्या बाबतीत शासनाने फेरविचार करावा.

मिळाव्यात माजी आ. शिरीष चौधरी, जिल्हाप्रमुख ड.राम रघुवंशी,जिल्हाप्रमुख गणेश गावित, जि प माजीअध्यक्ष वकील पाटील, महिला संपर्क संघटक कविता गावंडे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रसंगी नगराध्यक्ष सौ.रत्ना रघुवंशी,धडगावचे धनसिंग पावरा,जि.प सदस्य देवमन पवार, तालुकाप्रमुख डॉ.सयाजीराव मोरे,महिला जिल्हा प्रमुख ज्योती राजपूत,आदी उपस्थित होते.

### ऑगस्ट २०२७ पर्यंत पाण्याची उपलब्धता

झाला असून, गतवर्षी याच कालावधीत सुमारे ७५ टक्के पाऊस झाला होता. त्यामुळे उपलब्ध धरणांमधील पाणीसाठ्याचा काटकसरीने वापर करावा. पाण्याचा प्राधान्याने पिण्यासाठी वापर होईल, याची दक्षता घ्यावी. सध्या जिल्ह्यात एकही टँकर सुरू नसला तरी भविष्यात पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण झाल्यास त्यासाठी आवश्यक पूर्वनियोजन करावे, असे निर्देश पालकमंत्री श्री. मुश्रीफ यांनी दिले.

पीक परिस्थितीचा आढावा घेताना परतीचा पाऊस चांगला होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली. एल निनोच्या संभाव्य प्रभावामुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीचा विचार करून कृषी विभागाने सज्ज राहावे. पीक विमा योजनेत जिल्ह्यात ६२ हजार ७९४ शेतकरी सहभागी झाले असून, पीक नुकसानीचे पंचनामे व पीक कापणी प्रयोग नियमानुसार व तातडीने पूर्ण करून पात्र शेतकऱ्यांना नियमानुसार भरपाई मिळण्यासाठी पाठपुरावा करावा, असे त्यांनी सांगितले. ऑक्टोबरपासून पीक कापणी प्रयोग सुरू होतील, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी यांनी जिल्ह्यातील पीक परिस्थिती, पाणी उपलब्धता आणि विविध उपाययोजनांचा आढावा बैठकीत सादर केला. पीक विम्याबाबत संबंधित स्तरावर पाठपुरावा करण्यात येत असून, पात्र शेतकऱ्यांना नियमानुसार भरपाई मिळण्यासाठी कार्यवाही करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. कुपोषण निर्मूलनासाठी विविध उपाययोजना राबविण्यात येत असून, ग्रामीण भागातील परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवण्यात येत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

**गणेशोत्सव शांततेत साजरा करा**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी आवश्यक पोलिस बंदोबस्ताचे नियोजन करण्यात यावे. डीजेच्या वापराबाबत संबंधितांना आवश्यक सूचना देण्यात आल्या असून, शासनाच्या नियमांचे पालन होईल, याची दक्षता घ्यावी. गणेशोत्सव सर्वांनी शांततेत, सलोख्याने आणि परंपरेनुसार साजरा करावा, असे आवाहन पालकमंत्री श्री. मुश्रीफ यांनी केले.

जिल्ह्यातील रस्ते जाळे अधिक बळकट करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली. ग्रामीण भागातील दळणवळण अधिक सक्षम करण्यासाठी प्राधान्यक्रम निश्चित करून आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना पालकमंत्र्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

### आईच्या डोळ्यासमोर बिबट्याने बालकाची

केल्याचे दिसून आले. वनविभागाच्या अंदाजानुसार, शिकार करणारा मादी बिबट्या आहे. त्याला पकडण्याची परवानगी वनविभागाकडून प्राप्त झाली असून परिसरात सात पिंजरे लावले आहेत. घटनास्थळालगतच्या रहिवाशांनी रात्री घराबाहेर पडू नये, उघड्यावर झोपू नये, लहान मुलांची विशेष काळजी घ्यावी अशा सूचना देण्यात आल्या असून ड्रोन कॅमेरे व ट्रॅप कॅमेर्यांद्वारे टेहळणी केली जात आहे अशी माहिती देण्यात आली.

## पान १ वरुन

### तेली समाज वधु-वर मेळावा फॉर्मचे

सोनार, नगरसेवक तथा मेळावा समिती अध्यक्ष युवराज(सनी) लक्ष्मण चौधरी, नरेश रूपला चौधरी, मोतीलाल बाबुराव चौधरी, राजेंद्र हिरामण बागुल यांच्या हस्ते करण्यात आले. प्रकाशनानंतर उपस्थितांमध्ये, इच्छुक वधु, वर यांच्या पालकांपर्यंत पोहचवण्यासाठी देण्यात आले. या मेळाव्यासाठी समस्त तेली समाज बांधवांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. फॉर्म प्रकाशन कार्यक्रमास,- धुळे जिल्हाध्यक्षा तेली समाज महिला मंडळ सुमन पितांबर महाले, माजी महापौर जयश्री कमलाकर अहिरराव, माजी महापौर प्रतिभा शिवाजीराव चौधरी, धुळे शहर तेली समाज महिला मंडळ अध्यक्षा गिता रामेश्वर चौधरी, सेक्रेटरी धुळे तेली समाज महिला मंडळ जयश्री महेश बाविस्कर, अध्यक्ष धुळे तेली पंचायत मंडळ युवराज महादु चौधरी, जिल्हाध्यक्ष तंटामुक्त समिती महादु अंबर चौधरी, सेक्रेटरी धुळे तेली पंचायत मंडळ रामेश्वर धोंडू चौधरी, जिल्हा अध्यक्ष तेली समाज युवक मंडळ मिलिंद रविंद्र चौधरी, शहर अध्यक्ष तेली समाज युवक मंडळ अतिष प्रल्हाद चौधरी, कैलास छगनराव थोरात, चंद्रकांत माधवराव बागुल, रामभाऊ सिताराम चौधरी, आनंदा श्रावण करनकाळ, निरंजन रामभाऊ करनकाळ, केतन दिलीप जगताप, यशवंत रामचंद्र देवकर, सुनिलतात्या देवरे, भिकन बाबुराव चौधरी, भाऊसाहेब देविदास चौधरी, निलेश भिला महाले, शशिकांत बळीराम चौधरी, विनोद राजु चौधरी, रमेश शंकर करनकाळ, तुकाराम महादु चौधरी, ज्ञानेश्वर लालचंद चौधरी, चि. विवेक संजय चौधरी, चि. व्यंकटेश कमलाकर अहिरराव, उमेश शांताराम चौधरी, नितिन मोतीलाल चौधरी, सुभाष शामराव करनकाळ, सिद्धेश चौधरी, भुषण चौधरी, चिन्मय चौधरी, सिद्धेश प्रविण बोरसे, आदी मान्यवर उपस्थित होते.

## १२ वे पुण्यस्मरण



**कै. संजय सुभाषराव शिकारे**

(स्वर्गवास दि.११/९/१४)

कष्टाने केली आयुष्याची सुरुवात,
सगळ्यावर फिरवला मायेचा हात,
सुख जवळ येताच काळाने फिरवला पाठ,
जन्मो जन्मी पाहू आम्ही तुमची वाट!
आपणास भावपूर्ण श्रध्दांजली!

**✻ शोकाकुल ✻**

श्रीमती सरला संजय शिकारे (पत्नी)

बिपीन सुभाष शिकारे (भाऊ) राहुल सुभाष शिकारे (भाऊ)
ऋतुराज धर्मराज मुर्तडक (जावई) सौ.पायल ऋतुराज मुर्तडक
अनिकेत संजय शिकारे (मुलगा) कु.अभिलाषा ऋतुराज मुर्तडक (नात)

**समस्त शिकारे परिवार**

धुळ्यात 'प्लास्टो' आणी इतर सर्व नामांकित कंपनीच्या पाण्याच्या टाक्या आमच्याकडे होलसेल रेटमध्ये उपलब्ध आहेत..




१०० ते १०,००० लिटर पर्यंत गोल व चौरस टाक्या होलसेल रेट व हजर स्टॉक मध्ये उपलब्ध आहे.

धुळ्यात प्लास्टो कंपनीच्या टाक्या मिळण्याचे एकमेव ठिकाण...

**शंकर विजय सॉ मिल**

प्रकाश टॉकीज समोर, पारोळा रोड, धुळे.
फो. 9422285091

**विकणे आहेत**

२ बी-एच-के प्लॉट व दुकान विकणे आहेत.

**१ महिन्यात ताबा**

१) इंदिरा आर्केड,
प्लॉट नं. ६०, जयहिंद कॉलनी,
मॉडर्न नर्सरी समोर, देवपूर, धुळे.

२) उषा हाईटस्,
प्लॉट नं. १०३, जयहिंद कॉलनी,
सोना सुपर शॉप समोर, देवपूर, धुळे.

-: संपर्क :-
8698955000/9158478557

**पाहिजेत**

होलसेल मेडिकल दुकानासाठी
१) कॉम्प्युटर ऑपरेटर (महिला)- जागा २
२) हेल्पर - जागा १
३) सेल्समन- जागा २
-: समक्ष भेटा :-
श्री साई फार्मा
ग.नं.५, धुळे.

**पाहिजेत**

मेडिकलमध्ये कामासाठी
मुले/मुली पाहिजेत.
-:संपर्क:-
9881118707
234494/237494

## पान १ वरुन

### बॅनर लावण्यापूर्तीच भक्ती असेल तर अशी भक्ती

भार दिला जावू नये, असे मत नगरसेविका योगिता कुटे यांनी यावेळी व्यक्त केले. बॅनर्स बनविण्यास लागणाऱ्या खर्चापेक्षा परवानगीसाठी अधीक खर्च लागत असल्याने बॅनर लावण्याची परवानगी घेणे टाळले जाते. मुदतीपेक्षाही अधीक कालावधी बॅनर लागलेले दिसून येतात. बॅनर लावणाऱ्यांना काही प्रमाणात सुट दिली पाहिजे अशी अपेक्षा नगरसेवक अमीर पठाण यांनी स्थायी समिती समोर व्यक्त केली.

गणपती बसवतांना उभारण्यात येणारे आरास, बॅनर्समुळे वाहतुकीला कोणताही अडथळा होवू नये. गणपतीचे आगमन व विसर्जनात रस्त्यांवरील खड्डयांमुळे त्रास होवू नये याकरीता प्रमुख रस्त्यांची दुरूस्ती करावी. तसेच मानधनावरील आऊटसोर्सिंगच्या विषयाबाबत नगरसेवक अमोल मासूळे यांनी प्रश्न उपस्थित केला की, याआधी अशा प्रकारची प्रक्रिया राबवण्यात आली होती का? यावर एकमत झाले नाही. परिणामी विषय तहकूब ठेवण्यात आला.

### विरोधी पक्ष नेता पदावर नियुक्ती करा दीपक खोपडे यांचे महापौरांना निवेदन

धुळे, दि.१०- धुळे महानगरपालिकेतील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष-शिवसेना शहर विकास आघाडीच्या वतीने दीपक सुरेश खोपडे (बंटी खोपडे) यांची विरोधी पक्षनेतेपदी नियुक्ती करावी, अशी मागणी महापौरांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक तथा आघाडी प्रमुख व गटनेते शहाबाज फारूक शाह यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, राष्ट्रवादी काँग्रेस-शिवसेना शहर विकास आघाडीच्या गटाची विभागीय आयुक्तांकडे १३ सदस्यांची नोंदणी झालेली आहे. धुळे महानगरपालिका अधिनियमानुसार हा गट संख्येने मोठा गट असल्याचा निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

विरोधी पक्षनेत्याच्या नियुक्तीसंदर्भात यापूर्वी महापौरांना पत्र देण्यात आले होते. तसेच याचिकेवर औरंगाबाद खंडपीठाने गुणवत्तेच्या (मेरिट) आधारे लवकरात लवकर विरोधी पक्षनेत्याच्या निवडीबाबत निर्णय घेण्याचे निर्देश दिल्याचा उल्लेख निवेदनात करण्यात आला आहे. त्यामुळे आघाडीच्या गटाची संख्या लक्षात घेऊन नगरसेवक दीपक सुरेश खोपडे यांची विरोधी पक्षनेतेपदी नियुक्ती करावी, अशी शिफारस निवेदनातून करण्यात आली. यावेळी शिवसेनेचे महानगरप्रमुख संजय वाल्हे, नगरसेवक धीरज कलंत्री, तुषार नवले, तोसिफ खाटीक, रफिक हाजी, सादिक शेख, डॉ. सर्फराज अन्सारी, वैभव खोपडे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेनेचे पदाधिकारी, नगरसेवक आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## निधन वार्ता

### किसन घुगरे



नंदुरबार, दि.१०- शहरातील गवळीवाडा नंदेश्वर चौकातील रहिवासी किसन भिलाजी घुगरे निधन झाले. मृत्यूसमयी ते ४५ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, चार भाऊ, असा परिवार आहे. अर्जुन भिलाजी घुगरे यांचे ते बंधू होते.

**पाहिजेत**

लॉज कामासाठी खालील पदे भरणे आहेत.
मॅनेजर : १
कॅम्प्युटर ऑपरेटर : २ (महिला)
रुम बाय : ३
-:संपर्क:-
महाले रिजन्सी
आग्रारोड, धुळे
मो. 8551049444

**जागा भाड्याने देणे आहे**



खोलगल्ली भगवा चौक, कस्तुरबा गांधी रोड, कमल पुस्तकालय समोरील पहिला मजला

सर्व सोयींनी युक्त ६२५ स्क्वेअर फुट जागा
ऑफिस, डॉक्टर, लॅब यांना भाड्याने देणे आहे
योग्य आहे:
ऑफिस डॉक्टर लॅब
वैशिष्ट्ये:
✓ ६२५ चौ.फूट प्रशस्त जागा
✓ • २४/७ पाणी व वीज सुविधा
✓ पार्किंग उपलब्ध
✓ स्वच्छ व सुरक्षित परिसर
संपर्क : श्री. सतीश साठये
मो. नं. ९८२२३५७७०७
भाड्याने देण्यासाठी उपलब्ध | पहिल्या मजल्यावर | लगेच उपलब्ध
ताबडतोब संपर्क साधा | स्वच्छ, सुरक्षित, व्यावसायिक जागा

**माणुस पाहिजे**

आशुतोष सर्जीकल
गल्ली नं. ५,
सोन्या मारुती समोर,
सावरीयाके बाजुमें
बाहेर फिरण्यासाठी व
ऑफिस कामासाठी
-:समक्ष भेटा:-
9422775376

**पाहिजेत**

लेखी अकाउन्ट
लिहिणारा जेष्ट जेण्टस
लावणे आहे.
कापड दुकानात
काम करणेसाठी
लेडीज/जेण्टस पाहिजेत.
-: संपर्क :-
मो.9423941247

**माणुस लावणे आहे**

भाग्यश्री कृषी सेवा केंद्र, धुळे
-:संपर्क:-
पारोळा रोड, प्रकाश टाकीज समोर, धुळे
9423135555

## पान १ वरुन

### प्रविणकुमार लाडेंची अध्यक्षपदी निवड

मुख्याध्यापक संघाच्या जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचे श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेचे अध्यक्ष मा.आ.कुणाल पाटील यांनी अभिनंदन केले असून मा.आ.डॉ.सुधिर तांबे यांनी लाडे यांचा मानाचा फेटा घालून सत्कार केला.प्रविणकुमार लाडे यांच्या नियुक्तीचे सर्वत्र स्वागत करण्यात येत आहे.

### गायकवाड चौकात सिलेंडरचा स्फोट

घराच्या भिंतींना मोठे तडे गेले असून काही भाग कोसळला आहे, तसेच घरावरील पत्रेही उडून गेले आहेत. ढिगाऱ्याखाली अडकून घरातील टीव्ही, कुलर आणि इतर सर्व संसारोपयोगी साहित्याची मोठी नासधूस झाली आहे. या दुर्घटनेत साळवे यांच्या सासूबाईंना दुखापत झाली असून त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच धुळे महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाने आणि संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली आणि पुढील धोका टाळला. दरम्यान, घर आणि साहित्याचे अतोनात नुकसान झाल्यामुळे प्रशासनाने या घटनेची तातडीने दखल घेऊन योग्य ती नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी साळवे कुटुंबाकडून केली जात आहे.

## २२ वे पुण्यस्मरण



**स्व. सौ. सुनिता सुभाष विसपुते**

(जन्म २८/०१/१९६७) (मृत्यू ११/०९/२००४)

झालेत २२ वर्षे जाऊन तुम्हास स्वर्गाला ।
आठवण येते क्षणोक्षणी तुमची आम्हाला ।।
सागर प्राजक्ताचा संसार पुण्यातच फुलविला ।
चिमुकली रिध्द्वी म्हणते ये ना ग आजी खेळायला ।।
आकाश विजयश्रीने विदेशातच आपला झेंडा रोवला ।
तुमचा पादस्पर्श हवा होता त्यांच्या विदेशाच्या घराला ।।
सृष्टीचेही भाग्य उजळले, वाईकर परिवाराशी नाते जुळले ।
आदित्यरावांसारखे सु-संस्कारी जावई विसपुते परिवाराला मिळाले।।
सुनितातार्ईनीही मुलांवरील मातृत्वाची नाही कमी पडू दिली आस।
रावसाहेबांनी धरला दत्तमंदिरावर नित्य सेवेचा ध्यास ।।
तुमच्या आठवणीने दु:खी होतात विसपुते दुसाने परिवाराची मने ।
समस्त केले नगर वासिय वाहतात तुम्हा कोटी कोटी शब्द सुमने ।।

**✻ शोकाकुल ✻**

श्री.सुभाष बापूराव विसपुते (पती) (निवृत्त अभियंता, मनपा, धुळे)
सौ.सुनिता सुभाष विसपुते (बहीण)
श्री.सागरी सुभाष विसपुते (मुलगा) सौ.प्राजक्ता सागर विसपुते (सून)
श्री.आकाश सुभाष विसपुते (मुलगा) सौ.विजयश्री आकाश विसपुते (सून)
श्री.आदित्यराव प्रशांत वाईकर (जावाई) सौ.सृष्टी आदित्यराव वाईकर (मुलगी)
कु.रिध्द्वी सागर विसपुते (नात)

**श्री समर्थ कृपा इंजिनिअर्स, धुळे**
**आयोध्या शैक्षणिक व सांस्कृतिक मित्र मंडळ**
**व केले नगर मधील सर्व रहिवाशी**
**नकाणे रोड, देवपूर, धुळे.**

**पाहिजेत पाहीजेत**

विवेकानंद डोळ्यांचे हॉस्पीटल,जयहिंद कॉलेज रोड, धुळे च्या विविध सामाजिक उपक्रमा साठी पूर्ण वेळ/पार्ट टाईम मानधन/पगारावर असणारी पदे

1. व्यवस्थापक (Manager) गोंदूर येथील प्रस्तावित सर्व धर्म स्थळासाठी, देवपूर हॉस्पीटल साठी, आरोग्य शिबिरे आयोजन
2. वाहन चालक(Driver)
3. कमवा आणि शिका - भारत समाज संघ च्या Hospital Managment,optician,optometry,OT Assistant सारख्या 100% रोजगाराभिमुख कोर्सेस विनामूल्य/ नाममात्र शुल्क
4. दृष्टी स्वयंसेवक/ आरोग्य रक्षक- मानधनावर
5. चौकीदार Security

श्रम, वेळ, अनुभव,निष्ठा, क्षमता,उत्पन्नावर आधारित उत्कृष्ट पगार

संपर्क- डॉ राधेश्याम रोडा
9511890155,7588102864

५९ वर्षांपासुन धुळेकरांच्या विश्वासाला पात्र ठरलेले...

Authorised Dealer

सर्व आधुनिक व लेटेस्ट मॉडेल



0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.

*नियम व अटी लागू

श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.

श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे, फोनः (02562) 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०